# दयानंद विज्ञान महाविद्यालयात ' सर सर्गेई विनोग्राडस्की ' या शास्त्रज्ञाच्या स्मृतीदिनानिमित्त एक दिवसीय वेबिनार

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभाग आणि मायक्रोबायॉलॉजी सोसायटी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने सर सर्गेई विनोग्राडस्की या शास्त्रज्ञाच्या स्मृतीदिनानिमित्त ' जीवनचक्र आणि सेंद्रिय पदार्थांचे विघटन ' या विषयावरील एक दिवसीय वेबिनार संपन्न झाले.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एस.एस.बेल्लाळे,प्रमुख पाहुणे सूक्षमजीवशास्त्र विभाग, योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई येथील डॉ.अनिल नरसिंगे,कार्यशाळा समन्वयक व सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ.राहुल मोरे व डॉ.सुवर्णा चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ.अनिल नरसिंगे यांनी ' सर सर्गेई विनोग्राडस्की' या शास्त्रज्ञाच्या स्मृतीदिनानिमित्त ' जीवनचक्र आणि सेंद्रिय पदार्थांचे विघटन ' या विषयावर खोलवर विस्तृत माहिती दिली.

► 'प्रथिनशास्त्र, जनुकशास्त्र आणि जैव माहितीशास्त्र' या विषयावर कार्यशाळा

# जैव माहितीशास्त्राच्या माध्यमातून विद्यार्थ्य

**लातूर : प्रतिनिधी**

आज विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात प्रथिनशास्त्र, जनुकशास्त्र आणि जैव माहितीशास्त्र या तीनही विषयाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. या शाखांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण होते, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जैव माहितीशास्त्र केंद्रातील डॉ. रोहन मेश्राम यांनी केले.

दयानंद विज्ञान महाविद्यालयात युजीसी-सीपीई अंतर्गत सूक्ष्म जीवशास्त्र व जैव तंत्रज्ञान विभागाच्या वतीने तीन दिवसीय 'प्रथिनशास्त्र, जनुकशास्त्र आणि जैव माहितीशास्त्र' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. मेश्राम बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड होते. या प्रसंगी विचारपीठावर स्वारातीम विद्यापीठ उपकेंद्र, लातूर येथील डॉ. आशिष गुळवे, सूक्ष्म जीवशास्त्र व जैव तंत्रज्ञान विभागप्रमुख व कार्यशाळा डॉ. राहुल मोरे, प्रा. शरद गंगावणे, धुतेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नवीन तीन विषयाचे अभ्यासक्रम सुरू करण्यास महाराष्ट्र शासनाची मान्यता

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून बी.एस्सी.जैवतंत्रज्ञानशास्त्र ,एम.एस्सी. वनस्पतीशास्त्र व प्राणीशास्त्र या तीन विषयाच्या पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विषयाला महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने नुकतीच मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ आणि संदर्भाधीन दिनांक १३.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी नवीन अभ्यासक्रम यासाठी प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर केलेले होते. त्यात महाविद्यालयानेही या तिन्ही विषयाचा सदर प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवलेला होता, तरी सदर प्रस्तावाची संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहित केलेल्या निकषानुसार छाननी करण्यात आली. त्यातूनच दयानंद विज्ञान महाविद्यालय हे नावाजलेले महाविद्यालय असल्यामुळे महाविद्यालयाच्या परिसरातील उच्च शिक्षणाची मागणी व शैक्षणिक निकड लक्षात घेता या तीन्ही विषयाला कायम विनाअनुदान तत्वावर मंजुरी देण्यात आलेली आहे. यापूर्वीपासून दयानंद विज्ञान महाविद्यालयात पदव्युत्तर स्तरावर एम.एस्सी. भौतिकशास्त्र,गणित, संगणकशास्त्र,जैवतंत्रज्ञानशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र आणि रसायनशास्त्र हे विषय शिकवले जातात, अध्यापन केले जातात.

या नवीन विषयाला मान्यता मिळविण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रवींद्र सोळुंके, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.चंद्रशेखर स्वामी, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे, डॉ.कोमल गोमारे आदी प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

महाविद्यालयाच्या या यशस्वी कार्याबद्दल प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, उपाध्यक्ष ललीतभाई शहा,उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजयजी बोरा आदींनी अभिनंदन व कौतुक केले.

लोकमत

डॉ. डी.एन.मिश्रा यांचे प्रतिपादन

# आत्मिक मनोबलातून गुणवत्तापूर्ण नवीन संशोधन करणे काळाची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

■ डॉ. मिश्रा म्हणाले, भारतात मूलभूत संशोधनावर भर देऊन, योग्य निष्कर्ष काढून जागतिक स्तरावरील भारताची संशोधन क्षेत्रातील नावलौकिकता कशी वाढेल यासाठी मिसाईल मॅन, भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्यासारख्या प्रेरणादायी वैज्ञानिकांचा आदर्श घेऊन संशोधकांनी आपले आयुष्य उज्ज्वल बनविले पाहिजे. संशोधनाच्या क्षेत्रातील भारताचाही दर्जा उंचावला पाहिजे, असेही ते म्हणाले.

**लातूर :** गुणवत्तापूर्ण संशोधन करणे ही आधुनिक काळाची गरज असून उच्च दर्जाच्या संशोधनासाठी मनाची परिपक्वता असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण जागतिक स्तरावर संशोधनाची अनेक क्षेत्रे खुली आहेत, हे संशोधन करताना संगणक, प्रयोगशाळा, इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि मनाची प्रगल्भता दृढ करून युवा पिढीने संशोधनाच्या क्षेत्रात नवनवीन शोध लावून त्या संशोधनाचा समाज आणि देश हितासाठी कसा फायदा होईल याकडे लक्ष दिले पाहिजे.

पूर्वी केलेल्या संशोधनावर संशोधन करण्यापेक्षा आत्मिक मनोबलातून नवनवीन विषयावर संशोधन करावे, असे प्रतिपादन सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.डी.एन.मिश्रा यांनी केले.

दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांची तर उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, डॉ. राहुल मोरे, डॉ. कोमल गोमारे, डॉ. रोहिणी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक कार्यशाळा समन्वयक डॉ. कोमल गोमारे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. श्वेता मदने यांनी तर आभार डॉ. राहुल मोरे यांनी मानले. याप्रसंगी प्रा.मेघा पंडित, डॉ.महेश कराळे, प्रा.करूणा कोमटवार आदींसह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांनी दयानंद महाविद्यालयाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच संशोधनाच्या बाबतीत आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाच्या वतीने उपक्रम, विविध कार्यशाळा, वैज्ञानिकांचे मार्गदर्शन आयोजित केले जाते, असेही डॉ. दरगड म्हणाले.

---

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 8
04 May 2021

▶आत्मिक मनोबलातून गुणवत्तापूर्ण संशोधन ▶एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा

# जागतिक स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल करावे



**लातूर :** गुणवत्तापूर्ण संशोधन करणे ही आधुनिक काळाची गरज असून उच्च दर्जाच्या संशोधनासाठी मनाची परिपक्वता असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण जागतिक स्तरावर संशोधनाची अनेक क्षेत्रे खुली आहेत, हे संशोधन करताना संगणक, प्रयोगशाळा, इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि मनाची प्रगल्भता दृढ करुन युवा पिढीने संशोधनाच्या क्षेत्रात नवनवीन शोध लावून जागतिक स्तरावरून भारताचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. एन. मिश्रा यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'गुणवत्ता संशोधन आणि मन कंडिशनिंगची तत्त्वे' या विषयावरील एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे, कार्यशाळा समन्वयक डॉ. कोमल गोमारे, डॉ. रोहिणी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतना डॉ. मिश्रा म्हणाले, संशोधनाचा समाज आणि देश हितासाठी कसा फायदा होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. भारतात मूलभूत संशोधनावर भर देऊन, योग्य निष्कर्ष काढून जागतिक स्तरावरील भारताची संशोधन क्षेत्रातील नावलौकिकता कशी वाढेल यासाठी मिसाईल मॅन, भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे.अब्दुल कलाम यांच्यासारख्या प्रेरणादायी वैज्ञानिकांचा आदर्श घेऊन संशोधकांनी आपले आयुष्य उज्ज्वल बनविले पाहिजे आणि संशोधनाच्या क्षेत्रातील भारताचाही दर्जा उंचावला पाहिजे.पूर्वी केलेल्या संशोधनावर संशोधन करण्यापेक्षा आत्मिक मनोबलातून नवनवीन विषयावर संशोधन करावे, असे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड असे म्हणाले की, दयानंद विज्ञान महाविद्यालय हे गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि संशोधनाच्या बाबतीत नेहमीच अग्रेसर राहिलेले महाविद्यालय आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांच्या सुप्त कलागुणांना आणि संशोधनासाठी वाव मिळावा म्हणून आर्थिक स्तरावरील मदत, शिष्यवृत्तीची सोय आणि त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी नेहमीच पुढाकार घेते. वेगवेगळे उपक्रम, कार्यशाळा, तज्ज्ञ मार्गदर्शक व वैज्ञानिकांच्या मार्गदर्शनाचे आयोजन येथे केले जाते. यातूनच विद्यार्थी, समाज आणि देशहित साधले जाते असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यशाळा समन्वयक डॉ. कोमल गोमारे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. श्वेता मदने यांनी केले तर आभार डॉ. राहुल मोरे यांनी मानले. याप्रसंगी प्रा. मेघा पंडित, डॉ. महेश कराळे, प्रा. करुणा कोमटवार आदी प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पुणे, बारामती, बेंगलोर, सोलापूर, लातूर आदी ठिकाणातील पदवी, पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 8
11 Jun 2021

# पर्यावरण दिनानिमित्त ऑनलाईन स्पर्धा



**लातूर** : दयानंद विज्ञान महाविद्यालयात 'जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गो ग्रीन, ग्रीन वार्ता अंतर्गत ऑनलाईन विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बायो पोयट्री स्पर्धेत खंदाडे शुभांगी ही प्रथम, मुकेश बुशंकर हा द्वितीय तर दळवी अंकिता तृतीय आली. स्वरूप गावकरे याला उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. हॅन्डमोड पोस्टर स्पर्धेत शेळगे कोमल ही प्रथम, पटवारी रुद्रयानी ही द्वितीय तर बिराजदार मयुरी ही तृतीय आली. फ्लॅश कार्ड स्पर्धेत दळवी अंकिता ही प्रथम, गावकरे स्वरूप हा द्वितीय तर घुंगरडे जानवी ही तृतीय आली. या विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांच्या हस्ते प्रमाणपत्र व वृक्ष देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. दरगड म्हणाले की, निसर्ग आणि मानवाचा अतुट असा संबंध असून प्रत्येक मानवाने पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि निरोगी आयुष्यासाठी वृक्ष लागवड केली पाहिजे. ध्वनी, जल, वायू प्रदूषणाचे प्रमाण कमी करून पर्यावरणाचा ऱ्हास थांबवला पाहिजे. इंधन वाचवा, पर्यावरण वाचवा, प्लास्टिक निर्बंध, हरित विचार, स्वच्छ भारत, जैविक उपचारन, टाकाऊपासून टिकाऊ, हरितक्रांती अशा विविध विषयावर विद्यार्थ्यांत, समाजजीवनात जनजागृती व्हावी या उद्देशातून महाविद्यालयात या विषयावर विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, असे ते म्हणाले. सूत्रसंचालन व आभार प्रा.श्वेता मदने यांनी मानले.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयात विविध ऑनलाईन स्पर्धा संपन्न

## प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व वृक्ष देऊन बक्षीस वितरण



लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात म जागतिक पर्यावरण दिना म निमित्त ५ व ६ जून २०२१ रोजी गो ग्रीन, ग्रीन वार्ता अंतर्गत ऑनलाईन विविध स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते.फ बायो पोयट्री म स्पर्धेत खंदाडे शुभांगी ही प्रथम, मुकेश बुशंकर हा द्वितीय तर दळवी अंकिता तृतीय आली. स्वरूप गावकरे याला उत्त्ेजनार्थ बक्षीस मिळाले.फ हॅन्डमोड पोस्टर स्पर्धे मत शेळगे कोमल ही प्रथम, पटवारी रुद्रयानी ही द्वितीय तर बिराजदार मयूरी ही तृतीय आली. म फ्लॅश कार्ड म स्पर्धेत दळवी अंकिता ही प्रथम, गावकरे स्वरूप हा द्वितीय तर घुंगरडे जानवी ही तृतीय आली. या विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांच्या हस्ते प्रमाणपत्र व वृक्ष देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

बायो पोयट्री स्पर्धेसाठी प्रभारी म्हणून प्रा.श्वेता मदने तर परीक्षक म्हणून प्रा. मेघा पंडित, डॉ.गजानन बने, डॉ.रामशेट्टी शेटकार यांनी काम पाहिले. तर हॅन्डमोड पोस्टर स्पर्धेसाठी प्रभारी म्हणून डॉ. मनीषा गुरमे, प्रा. निकिता शिंदे तर परीक्षक म्हणून डॉ. चंद्रशेखर स्वामी, डॉ. राहुल मोरे, डॉ. नंदिनी कोरडे हे होते. याशिवाय फ्लॅश कार्ड स्पर्धेसाठी प्रभारी म्हणून डॉ.महेश कराळे तर परीक्षक म्हणून डॉ. रोहिणी शिंदे, डॉ. रवींद्र सोळुंके, डॉ. आण्णाराव चौगुले यांनी काम पाहिले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड असे म्हणाले की, निसर्ग आणि मानवाचा अतुट असा संबंध असून प्रत्येक मानवाने पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि निरोगी आयुष्यासाठी वृक्ष लागवड केली पाहिजे. ध्वनी, जल, वायू प्रदूषणाचे प्रमाण कमी करून पर्यावरणाचा ऱ्हास थांबवला पाहिजे. इंधन वाचवा,पर्यावरण वाचवा, प्लास्टिक निर्बंध, हरित विचार ,स्वच्छ भारत ,जैविक उपचारन, टाकाऊपासून टिकाऊ, हरितक्रांती अशा विविध विषयावर विद्यार्थ्यात, समाजजीवनात जनजागृती व्हावी या उद्देशातून महाविद्यालयात या विषयावर विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, असे ते म्हणाले.

या विविध स्पर्धेचे समन्वयक म्हणून डॉ. कोमल गोमारे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार प्रा.श्वेता मदने यांनी मानले.याप्रसंगी महाविद्यालयात वृक्षारोपणही करण्यात आले. या ऑनलाईन स्पर्धेप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, स्पर्धेतील विविध महाविद्यालयातील सहभागी विद्यार्थी आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

मराठवाडा नेता

# पर्यावरणाचे संरक्षण करणे ही काळाची गरज : प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड




लातूर, दि. ६ :....

पर्यावरणाची गुणवत्ता वाढवणे, समस्या व संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पर्यावरणविषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून पोषक वातावरणाची निर्मिती करणे, हा पर्यावरण दिन साजरा करण्यामागचा मुख्य हेतू आहे.

पर्यावरण (Environment) हा शब्द मूळ फ्रेंच शब्द Environ या शब्दापासून तयार झाला आहे. एर्पीळीप म्हणजे Surrounding or encircle. सजीव-निर्जीव यांच्यामधील क्रिया-प्रतिक्रिया व आंतरक्रियांमधून साकार झालेली सजीवाच्या सभोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय. पहिल्या महायुद्धानंतर मानवाच्या निसर्गावरील आघाताचे परिणाम शास्त्रज्ञांच्या लक्षात आले. त्याचप्रमाणे औद्योगिक क्रांतीच्या फळांबरोबर त्याचे दूरगामी गंभीर परिणाम मानवाला भेडसावू लागले. म्हणून इ. स. १९६० मध्ये पर्यावरणशास्त्र किंवा पर्यावरण विज्ञान हे विषय अभ्यासासाठी स्वतंत्रपणे लागू करण्यात आले.

पर्यावरणातील विविध तत्त्व, संबोधक आणि सिद्धांतासोबतच विविध पर्यावरणातील घटकांचे विश्लेषण, तत्त्वज्ञानाचे उपयोजन आणि पर्यावरण संरक्षण व संधारणासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा, असेही प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यानी नमूद केले.

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 8
07 Jun 2021

▶प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड ▶जागतिक पर्यावरण दिना निमित्त वृक्षारोपण

# पर्यावरणाचे संरक्षण करणे ही काळाची गरज

**लातूर : प्रतिनिधी**

मानव हा पर्यावरणाचाच एक कुशाग्र घटक आहे. मात्र पर्यावरणाच्या प्रत्येक घटकात मानवी हस्तक्षेप वाढत चालला आहे. म्हणून पर्यावरणीय आपत्तीचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन व त्यावर परिणामकारक उपाययोजना करण्यासाठी शिक्षण महत्त्वपूर्ण असून पर्यावरणाचे संरक्षण करणे ही काळाजी गरज निर्माण झाल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांनी केले.

दयानंद विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ५ जून 'जागतिक पर्यावरण दिना' निमित्त महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. दरगड बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, प्राचार्य डॉ. साळुंके, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.राहुल जाधव, डॉ. श्रेयश माहुरकर, डॉ. कोमल गोमारे, प्रा. श्वेता मदन आदींची उपस्थिती होती




पर्यावरण हा शब्द मूळ फ्रेंच शब्दापासून तयार झाला आहे. सजीव-निर्जीव यांच्यामधील क्रिया-प्रतिक्रिया व आंतरक्रियांमधून साकार झालेली सजीवाच्या सभोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय, असे सांगून प्राचार्य डॉ. दरगड म्हणाले की, पर्यावरणातील विविध तत्त्व, संबोधक आणि सिद्धांतासोबतच विविध पर्यावरणातील घटकांचे विश्लेषण, तत्त्वज्ञानाचे उपयोजन आणि पर्यावरण संरक्षण व संधारणासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा. पर्यावरणाची गुणवत्ता वाढवणे, समस्या व संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पर्यावरणविषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून पोषक वातावरणाची निर्मिती करणे, हा पर्यावरण दिन साजरा करण्यामागचा मुख्य हेतू आहे.

## पर्यावरणाचे संरक्षण करणे ही काळाची गरज: प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड

लातूर :- पर्यावरणाची गुणवत्ता वाढवणे, समस्या व संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पर्यावरणविषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून पोषक वातावरणाची निर्मिती करणे, हा पर्यावरण दिन साजरा करण्यामागचा मुख्य हेतु आहे.

पर्यावरण (एपींळीपाशपी) हा शब्द मूळ फ्रेंच शब्द एपींळीप या शब्द-ापासुन तयार झाला आहे. एपींळीप म्हणजे डींीपवळपस ी शपलळी-लश्रश. सजीव-निर्जीव यांच्यामधील क्रिया-प्रतिक्रिया व आंतरक्रियांमधून साकार झालेली सजीवाच्या सभोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय. पहिल्या महायुद्धानंतर मानवाच्या निसर्गावरील आघाताचे परिणाम शास्त्रज्ञांच्या लक्षात आले. त्याचप्रमाणे औद्योगिक क्रांतीच्या फळांबरोबर त्याचे दूरगामी गंभीर परिणाम मानवाला भेडसावू ला-



गले. म्हणून इ. स. १९६० मध्ये पर्यावरणशास्त्र किंवा पर्यावरण विज्ञान हे विषय अभ्यासासाठी स्वतंत्रपणे लागू करण्यात आले.

मानव हा पर्यावरणाचाच एक कुशाग्र घटक आहे. मात्र पर्यावरणाच्या प्रत्येक घटकात मानवी हस्तक्षेप वाढत चालला आहे. म्हणून पर्यावरणीय आपत्तीचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन व त्यावर परिणामकारक उपाययोजना करण्यासाठी शिक्षण महत्त्वपूर्ण बनले आहे.

पर्यावरणातील विविध तत्त्व, संबोधक आणि सिद्धांतासोबतच विविध पर्यावरणातील घटकांचे विश्लेषण, तत्त्वज्ञानाचे उपयोजन आणि पर्यावरण संरक्षण व संधारणासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा, असेही प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यानी नमूद केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ५ जून मजागतिक पर्यावरण दिनाफनिमित्त महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी वृक्षारोपण करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड समवेत दयानंद कला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साळुंके, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.राहुल जाधव, डॉ.श्रेयश माहुरकर, डॉ. कोमल गोमारे,प्रा.श्वेता मदने, इतर प्राध्यापक,रासेयो विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

पर्यावरणाचे संरक्षण करणे गरज: प्राचार्य डॉ. जयप्रक

लातूर :- पर्यावरणाची गुणवत्ता वाढवणे, समस्या व संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पर्यावरणविषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून पोषक वातावरणाची निर्मिती करणे, हा पर्यावरण दिन साजरा करण्यामागचा मुख्य हेतु आहे.

पर्यावरण (एपींळीपाशपी) हा शब्द मूळ फ्रेंच शब्द एपींळीप या शब्द-ापासुन तयार झाला आहे. एपींळीप म्हणजे डींीपवळपस ी शपलळी-लश्रश. सजीव-निर्जीव यांच्यामधील क्रिया-प्रतिक्रिया व आंतरक्रियांमधून साकार झालेली सजीवाच्या सभोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय. पहिल्या महायुद्धानंतर मानवाच्या निसर्गावरील आघाताचे परिणाम शास्त्रज्ञांच्या लक्षात आले. त्याचप्रमाणे औद्योगिक क्रांतीच्या फळांबरोबर त्याचे दूरगामी गंभीर परिणाम मानवाला भेडसावू ला-



गले. म्हणून इ. स. १९६० मध्ये पर्यावरणशास्त्र किंवा पर्यावरण विज्ञान हे विषय अभ्यासासाठी स्वतंत्रपणे लागू करण्यात आले.

मानव हा पर्यावरणाचाच एक कुशाग्र घटक आहे. मात्र पर्यावरणाच्या प्रत्येक घटकात मानवी हस्तक्षेप वाढत चालला आहे. म्हणून पर्यावरणीय

लोकमत

# दयानंद महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : कोरोनाच्या काळात विद्यार्थ्यांनी कुटुंब, समाज, देश आणि जागतिक पातळीवरील परिस्थिती बदलण्यासाठी विद्यार्थी सहाय्यक म्हणून पुढाकार घेतला पाहिजे. समाज जीवनात उदासीनता, चिंता आणि मानसिक भय आदी समस्यांना लोकांना तोंड द्यावे लागते आहे. त्यामुळे करोनाविषयक जनजागृती केली पाहिजे. असे मत डॉ.कोमल गोमारे यांनी येथे व्यक्त केले.

दयानंद विज्ञान महाविद्यालय आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने मानसिक आरोग्य आणि शारीरिक पैलू या विषयावरील एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळेत त्या बोलत होत्या. मंचावर प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ. एस.एस.बेल्लाळे, प्रा.श्रेयश माहुरकर यांची उपस्थिती होती. डॉ. गोमारे म्हणाल्या, समाजात सकारात्मक विचाराचे बीजारोपन करून ही लढाई जिंकली पाहिजे. कोरोनाची तीव्र लक्षणे घालविण्यासाठी मदतनीस व मार्गदर्शक विद्यार्थी सहाय्यक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली पाहिजे, असेही त्या म्हणाल्या. प्रास्ताविक डॉ. श्रेयस माहूरकर यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. श्वेता मदने यांनी मानले.

## मदतीसाठी विद्यार्थ्यांनी पूढाकार घ्यावा...

- समाजाचे रुण फेडावे यासाठी विद्यार्थी सहाय्यकांनी कोविड असणा-या रुग्णास मदत केली पाहिजे. स्वतःचे रक्षण करण्याबरोबर घरातील, समाजातील व्यक्ती आणि इतर सदस्यांचे संरक्षण केले पाहिजे. मानसशास्त्रीय समुपदेशन केले पाहिजे, असेही प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड म्हणाले.

पुरोगामी विचाराचे
एकमत



# विद्यार्थ्यांनी कोरोनाविषयक जनजागृती करावी : डॉ. गोमारे

**लातूर : प्रतिनिधी**

कोवीड -१९ च्या काळात विद्यार्थ्यांनी कुटुंब, समाज, देश आणि जागतिक पातळीवरील परिस्थिती बदलण्यासाठी विद्यार्थी सहाय्यक म्हणून पुढाकार घेतला पाहिजे. कारण कोविड -१९ दरम्यान समाजजीवनात उदासीनता, चिंता आणि मानसिक भय आदी समस्यांना लोकांना तोंड द्यावे लागते आहे. त्यामुळे कोरोना विषयक जनजागृती केली पाहिजे. समाजात सकारात्मक विचाराचे बिजारोपन करून ही लढाई जिंकली पाहिजे, असे असे प्रतिपादन डॉ. कोमल गोमारे यांनी केले.

दयानंद विज्ञान महाविद्यालय आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषद उच्च शिक्षण विभाग, शिक्षण मंत्रालय भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने कोवीड-१९ च्या उद्रेकातील मानसिक आरोग्य आणि शारीरिक पैलू संबंधित मार्गदर्शन करण्यासाठी विद्यार्थी सहाय्यक या विषयावरील एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा संपन्न झाली. याप्रसंगी कार्यशाळा कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे, प्रा. श्रेयश माहूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

करोनाची तीव्र लक्षणे घालविण्यासाठी मदतनीस व मार्गदर्शक विद्यार्थी सहाय्यक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली पाहिजे, असे सांगून डॉ. गोमारे म्हणाल्या की, विद्यार्थी सहाय्यकांनी रुग्णाचे नकारात्मक विचार, भावना आणि वर्तन ओळखून त्यांच्यात सकारात्मक विचार रूजवून परिस्थितीशी कसा सामना करायचा आणि विधायक आणि जबाबदार निर्णय कसा घ्यायचा यासाठी मदत केली पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. दरगड म्हणाले की, कोरोना व्हायरसने संपूर्ण जग त्रस्त आहे. अनेक रुग्ण पीडित आहेत. तेव्हा समाजाचे रूण फेडावे




यासाठी विद्यार्थी सहाय्यकांनी कोविड असणाऱ्या सदस्यास मदत केली पाहिजे. स्वतःचे रक्षण करण्याबरोबर घरातील, समाजातील व्यक्ती आणि इतर सदस्यांचे संरक्षण केले पाहिजे. मानसशास्त्रीय समुपदेशन केले पाहिजे. याशिवाय कोविड - १९ शी संबंधित कोणत्याही लक्षणांबद्दल त्यांच्या किंवा इतर कुटुंबातील सदस्यांच्या आरोग्यावर नियमित देखरेख ठेवली पाहिजे. रोगाबद्दल असलेल्या चुकीच्या माहितीचे खंडण केले पाहिजे. संपर्कातील लोकांच्या मानसिक आरोग्याचे प्रश्न आणि चिंता मिटविली पाहिजे. मास्क, सॅनिटाझर, सोशल अंतर यांचे पालन केले पाहिजे, असे ते म्हणाले.

यावेळी उपप्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे यांनीही मनोगत व्यक्त केले. या कार्यशाळेतून महाराष्ट्रातीलच नव्हे तर इतर राज्यातील विद्यार्थ्यांनाही प्रोत्साहित करण्यात आले. डॉ. श्रेयस माहूरकर यांनी प्रास्ताविक केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. श्वेता मदने यांनी मानले. याप्रसंगी डॉ. मेल्विन, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयामध्ये एक दिवसीय कार्यशाळा

**लातूर/प्रतिनिधी** : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालय आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषद उच्च शिक्षण विभाग, शिक्षण मंत्रालय भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने कोवीड–१९ च्या उद्रेकातील मानसिक आरोग्य आणि शारीरिक पैलू संबंधित मार्गदर्शन करण्यासाठी विद्यार्थी सहाय्यक या विषयावरील एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा संपन्न झाली.याप्रसंगी कार्यशाळा कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ. एस.एस.बेल्लाळे, प्रमुख पाहुणे डॉ. कोमल गोमारे, प्रा.श्रेयश माहुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ.कोमल गोमारे असे म्हणाल्या की,कोवीड –१९ च्या काळात विद्यार्थ्यांनी कुटुंब, समाज,देश आणि जागतिक पातळीवरील परिस्थिती बदलण्यासाठी विद्यार्थी सहाय्यक म्हणून पुढाकार घेतला पाहिजे. कारण कोविड –१९ दरम्यान समाजजीवनात उदासीनता, चिंता आणि मानसिक भय आदी समस्यांना लोकांना तोंड द्यावे लागते आहे. त्यामुळे करोनाविषयक जनजागृती केली पाहिजे.समाजात सकारात्मक विचाराचे बिजारोपन करून ही लढाई जिंकली पाहिजे.करोनाची तीव्र लक्षणे घालविण्यासाठी मदतनीस व मार्गदर्शक विद्यार्थी सहाय्यक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली पाहिजे. विद्यार्थी सहाय्यकांनी रुग्णाचे नकारात्मक विचार,भावना आणि वर्तन ओळखून त्यांच्यात सकारात्मक विचार रुजवून परिस्थितीशी कसा सामना करायचा आणि विधायक आणि जबाबदार निर्णय कसा घ्यायचा यासाठी मदत केली पाहिजे,असे त्या म्हणाल्या.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड असे म्हणाले की, कोरोना व्हायरसने




संपूर्ण जग त्रस्त आहे.अनेक रूग्ण पीडित आहेत.तेव्हा समाजाचे रुण फेडावे यासाठी विद्यार्थी सहाय्यकांनी कोविड असणार्या सदस्यास मदत केली पाहिजे. स्वतःचे रक्षण करण्याबरोबर घरातील,समाजातील व्यक्ती आणि इतर सदस्यांचे संरक्षण केले पाहिजे. मानसशास्त्रीय समुपदेशन केले पाहिजे.याशिवाय कोविड – १९ शी संबंधित कोणत्याही लक्षणांबद्दल त्यांच्या किंवा इतर कुटुंबातील सदस्यांच्या आरोग्यावर नियमित देखरेख ठेवली पाहिजे. रोगाबद्दल असलेल्या चुकीच्या माहितीचे खंडण केले पाहिजे. संपर्कातील लोकांच्या मानसिक आरोग्याचे प्रश्न आणि चिंता मिटविली पाहिजे. मास्क,सॅनिटायर,सोशल अंतर यांचे पालन केले पाहिजे,असे ते म्हणाले.

यावेळी उपप्राचार्य डॉ. एस.एस.बेल्लाळे यांनीही मनोगत व्यक्त केले.या कार्यशाळेतून महाराष्ट्रातीलच नव्हे तर इतर राज्यातील विद्यार्थ्यांनाही प्रोत्साहित करण्यात आले. डॉ.श्रेयस माहूरकर यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.श्र्वेता मदने यांनी मानले. याप्रसंगी डॉ.मेल्विन, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.


पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 8
04 May 2021


▶आत्मिक मनोबलातून गुणवत्तापूर्ण संशोधन ▶एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा



# जागतिक स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल करावे

**लातूर** : गुणवत्तापूर्ण संशोधन करणे ही आधुनिक काळाची गरज असून उच्च दर्जाच्या संशोधनासाठी मनाची परिपक्वता असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण जागतिक स्तरावर संशोधनाची अनेक क्षेत्रे खुली आहेत, हे संशोधन करताना संगणक, प्रयोगशाळा, इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि मनाची प्रगल्भता दृढ करुन युवा पिढीने संशोधनाच्या क्षेत्रात नवनवीन शोध लावून जागतिक स्तरावरून भारताचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. एन. मिश्रा यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'गुणवत्ता संशोधन आणि मन कंडिशनिंगची तत्त्वे' या विषयावरील एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे, कार्यशाळा समन्वयक डॉ. कोमल गोमारे, डॉ. रोहिणी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतना डॉ. मिश्रा म्हणाले, संशोधनाचा समाज आणि देश हितासाठी कसा फायदा होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. भारतात मूलभूत संशोधनावर भर देऊन, योग्य निष्कर्ष काढून जागतिक स्तरावरील भारताची संशोधन क्षेत्रातील नावलौकिकता कशी वाढेल यासाठी मिसाईल मॅन, भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे.अब्दुल कलाम यांच्यासारख्या प्रेरणादायी वैज्ञानिकांचा आदर्श घेऊन संशोधकांनी आपले आयुष्य उज्ज्वल बनविले पाहिजे आणि संशोधनाच्या क्षेत्रातील भारताचाही दर्जा उंचावला पाहिजे.पूर्वी केलेल्या संशोधनावर संशोधन करण्यापेक्षा आत्मिक मनोबलातून नवनवीन विषयावर संशोधन करावे, असे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड असे म्हणाले की, दयानंद विज्ञान महाविद्यालय हे गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि संशोधनाच्या बाबतीत नेहमीच अग्रेसर राहिलेले महाविद्यालय आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांच्या सुप्त कलागुणांना आणि संशोधनासाठी वाव मिळावा म्हणून आर्थिक स्तरावरील मदत, शिष्यवृत्तीची सोय आणि त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी नेहमीच पुढाकार घेते. वेगवेगळे उपक्रम, कार्यशाळा, तज्ज्ञ मार्गदर्शक व वैज्ञानिकांच्या मार्गदर्शनाचे आयोजन येथे केले जाते. यातूनच विद्यार्थी, समाज आणि देशहित साधले जाते असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यशाळा समन्वयक डॉ. कोमल गोमारे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. श्वेता मदने यांनी केले तर आभार डॉ. राहुल मोरे यांनी मानले. याप्रसंगी प्रा. मेघा पंडित, डॉ. महेश कराळे, प्रा. करुणा कोमटवार आदी प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पुणे, बारामती, बेंगलोर, सोलापूर, लातूर आदी ठिकाणातील पदवी, पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.

# आत्मिक मनोबलातून गुणवत्तापूर्ण संशोधन करून जागतिक स्तरावर भारताचे नाव उज्वल करावे : प्र.कुलगुरू डॉ.डी.एन.मिश्रा

**लातूर/प्रतिनिधी** : गुणवत्तापूर्ण संशोधन करणे ही आधुनिक काळाची गरज असून उच्च दर्जाच्या संशोधनासाठी मनाची परिपक्वता असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण जागतिक स्तरावर संशोधनाची अनेक क्षेत्रे खुली आहेत, हे संशोधन करताना संगणक, प्रयोगशाळा, इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि मनाची प्रगल्भता दृढ करून युवा पिढीने संशोधनाच्या क्षेत्रात नवनवीन शोध लावून त्या संशोधनाचा समाज आणि देश हितासाठी कसा फायदा होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. भारतात मूलभूत संशोधनावर भर देऊन, योग्य निष्कर्ष काढून जागतिक स्तरावरील भारताची संशोधन क्षेत्रातील नावलौकिकता कशी वाढेल यासाठी मिसाईल मॅन, भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्यासारख्या प्रेरणादायी वैज्ञानिकांचा आदर्श घेऊन संशोधकांनी आपले आयुष्य उज्वल बनविले पाहिजे आणि संशोधनाच्या क्षेत्रातील भारताचाही दर्जा उंचावला पाहिजे. पूर्वी केलेल्या संशोधनावर संशोधन करण्यापेक्षा आत्मिक मनोबलातून नवनवीन विषयावर संशोधन करावे, असे प्रतिपादन सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.एन.मिश्रा यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने ' गुणवत्ता संशोधन आणि मन कंडिशनिंगची तत्वे ' या विषयावरील एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे, कार्यशाळा समन्वयक डॉ. कोमल गोमारे, डॉ. रोहिणी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड असे म्हणाले की, दयानंद विज्ञान महाविद्यालय हे गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि संशोधनाच्या बाबतीत नेहमीच अग्रेसर राहिलेले महाविद्यालय आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांच्या सुप्त कलागुणांना आणि संशोधनासाठी वाव मिळावा म्हणून आर्थिक स्तरावरील मदत, शिष्यवृत्तीची सोय आणि त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी नेहमीच पुढाकार घेते. वेगवेगळे उपक्रम, कार्यशाळा, तज्ज्ञ मार्गदर्शक व वैज्ञानिकांच्या मार्गदर्शनाचे आयोजन येथे केले जाते. यातूनच विद्यार्थी, समाज आणि देशहित साधले जाते असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यशाळा समन्वयक डॉ.कोमल गोमारे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.श्वेता मदने यांनी केले तर आभार डॉ.राहुल मोरे यांनी मानले.याप्रसंगी प्रा.मेधा पंडित, डॉ.महेश कराळे, प्रा.करुणा कोमटवार आदी प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पुणे,बारामती,बेंगलोर ,सोलापूर,लातूर आदी ठिकाणातील पदवी,पदव्युत्तर स्तरावरील



विद्यार्थी,संशोधक,प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.

लोकमत

डॉ. डी.एन.मिश्रा यांचे प्रतिपादन

# आत्मिक मनोबलातून गुणवत्तापूर्ण नवीन संशोधन करणे काळाची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

**लातूर :** गुणवत्तापूर्ण संशोधन करणे ही आधुनिक काळाची गरज असून उच्च दर्जाच्या संशोधनासाठी मनाची परिपक्वता असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण जागतिक स्तरावर संशोधनाची अनेक क्षेत्रे खुली आहेत, हे संशोधन करताना संगणक, प्रयोगशाळा, इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि मनाची प्रगल्भता दृढ करून युवा पिढीने संशोधनाच्या क्षेत्रात नवनवीन शोध लावून त्या संशोधनाचा समाज आणि देश हितासाठी कसा फायदा होईल याकडे लक्ष दिले पाहिजे.

पूर्वी केलेल्या संशोधनावर संशोधन करण्यापेक्षा आत्मिक मनोबलातून नवनवीन विषयावर संशोधन करावे, असे प्रतिपादन सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.डी.एन.मिश्रा यांनी केले.

दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांची तर उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, डॉ. राहुल मोरे, डॉ. कोमल गोमारे, डॉ. रोहिणी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक कार्यशाळा समन्वयक डॉ. कोमल गोमारे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. श्वेता मदने यांनी तर आभार डॉ. राहुल मोरे यांनी मानले. याप्रसंगी प्रा.मेघा पंडित, डॉ.महेश कराळे, प्रा.करूणा कोमटवार आदींसह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांनी दयानंद महाविद्यालयाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच संशोधनाच्या बाबतीत आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाच्या वतीने उपक्रम, विविध कार्यशाळा, वैज्ञानिकांचे मार्गदर्शन आयोजित केले जाते, असेही डॉ. दरगड म्हणाले.

■ डॉ. मिश्रा म्हणाले, भारतात मूलभूत संशोधनावर भर देऊन, योग्य निष्कर्ष काढून जागतिक स्तरावरील भारताची संशोधन क्षेत्रातील नावलौकिकता कशी वाढेल यासाठी मिसाईल मॅन, भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्यासारख्या प्रेरणादायी वैज्ञानिकांचा आदर्श घेऊन संशोधकांनी आपले आयुष्य उज्ज्वल बनविले पाहिजे. संशोधनाच्या क्षेत्रातील भारताचाही दर्जा उंचावला पाहिजे, असेही ते म्हणाले.

वसुंधरा दिनानिमित्त कार्यशाळा

# पर्यावरणाचे संवर्धन करणे प्रत्येकाचे कर्तव्य

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : आजचे युग विज्ञान तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाचे युग आहे. या युगात प्रत्येक नागरिकांनी पर्यावरणाचे, नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन व रक्षण केले पाहिजे. कारण शहरीकरण, आधुनिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड होत आहे. पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे, प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे. वृक्षारोपणासारखे उपक्रम राबवून वसुंधरेचे संरक्षण केले पाहिजे, असे प्रतिपादन नांदेड येथील व्यवस्थापकीय संचालक तथा विशेष कार्यकारी अधिकारी डॉ.अमोल शिरफुले यांनी येथे केले.

दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने वसुंधरा दिनानिमित्त आयोजित ऑनलाइन एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांची उपस्थिती होती. डॉ.शिरफुले म्हणाले, कारोना काळात पृथ्वीवरील जैविक व अजैविक घटकावर लक्ष केंद्रित करून आपली जबाबदारी पार पाडणे गरजेचे आहे. पाणी, वीज आणि ऑक्सिजन-हवा यांचे संवर्धन करण्याची गरज आहे. हे संवर्धन केले, तरच मानवी जीवनाचे उज्ज्वल असे भवितव्य आहे. याप्रसंगी कार्यक्रम समन्वयक डॉ.कोमल गोमारे, डॉ.राहुल मोरे, प्रा.करुणा कोमटव... उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्ला... डॉ.जमन अनगुलवार, डॉ.रत्ना की... प्रा.श्वेता मदने, डॉ.महेश कर... डॉ.रामशेट्टी शेटकार, प्रा.बन... आदींसह प्राध्यापक व शिक्षके... कर्मचारी उपस्थित होते.



## वृक्षारोपण मोहिमेला गती देण्याचा गरज...

पर्यावरणाचे संवर्धन करणे ही आधुनिक काळाची गरज आहे. पर्यावरण संवर्धनासाठी सामाजिक जागृती, अपारंपरिक योग्य ऊर्जास्रोतांचा वापर, स्थानिक प्रजातीच्या झाडांचे वृक्षारोपण, सोलार एनर्जी प्रकल्प उभारणे आदी उपक्रम राबविले पाहिजेत. एक जबाबदार नागरिक म्हणून एक तरी झाड लावले पाहिजे आणि निसर्गाचा समतोल साधला पाहिजे, असेही प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड म्हणाले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षारोपण तसेच वृक्षसंवर्धन मोहिमेला गती देणार असल्याचेही प्राचार्य डॉ. दरगड म्हणाले.

epaper.lokmat.com

औरंगाबाद, शनिवार, दि. २४ एप्रिल २०२१

## पर्यावरणाचे संवर्धन व रक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य- डॉ.अमोल शिरफुले









## पर्यावरणाचे संवर्धन व रक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य-







पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 8
23 Apr 2021

# पर्यावरणाचे संवर्धन व रक्षण करणे नागरिकाचे आद्य कर्तव्य

## डॉ . अमोल शिरफुले यांचे प्रतिपादन

**लातूर : प्रतिनिधी**

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाचे युग आहे. या युगात प्रत्येक नागरिकांनी पर्यावरणाचे, नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन व रक्षण केले पाहिजे. कारण शहरीकरण, आधुनिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड होत आहे. पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे. प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे. आज करोना काळात पृथ्वीवरील जैविक व अजैविक घटकावर लक्ष केंद्रित करून आपली जबाबदारी पार पाडणे गरजेचे आहे. आज पाणी, वीज आणि ऑक्सिजन- हवा यांचे संवर्धन करण्याची गरज आहे. हे संवर्धन केले तरच मानवी जीवनाचे उज्वल असे भवितव्य आहे. वृक्षारोपणासारखे विविध उपक्रम राबवून पृथ्वी, वसुंधरेचे संरक्षण केले पाहिजे, असे प्रतिपादन नांदेड येथील व्यवस्थापकीय संचालक डॉ. अमोल शिरफुले यांनी केले.



दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने २२ एप्रिल रोजी 'पृथ्वी दिना' च्या निमित्ताने आयोजित' तू माझ्यासाठी वाचवशील... तुला वाचवीन' या विषयावरील ऑनलाईन एक दिवसीय कार्यशाळेच्या व्याख्यानात डॉ. शिरफुले बोलत होते. या ऑनलाईन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड होते. याप्रसंगी डॉ. कोमल गोमारे, डॉ. राहुल मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. दरगड म्हणाले की, पर्यावरणाचे संवर्धन करणे ही आधुनिक काळाची गरज आहे. कारण पृथ्वी दिनानिमित्त असे म्हणता येते की, 'तू माझा बचाव करशील, तर मी तुझे रक्षण करेल' हे लक्षात घेऊन निसर्गाचे संरक्षण केले पाहिजे. पर्यावरण संवर्धनासाठी सामाजिक जागृती, अपारंपरिक योग्य ऊर्जास्त्रोतांचा वापर, स्थानिक प्रजातीच्या झाडांचे वृक्षारोपण, सोलार एनर्जी प्रकल्प उभारणे आदी उपक्रम राबवले पाहिजेत. एक जबाबदार नागरिक म्हणून एक तरी झाड लावले पाहिजे आणि निसर्गाचा समतोल साधला पाहिजे असे ते म्हणाले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. करूणा कोमटवार यांनी मानले. प्रमुख पाहुण्याचा परिचय डॉ. कोमल गोमारे यांनी करून दिला.उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांचेही सहकार्य लाभले. याप्रसंगी डॉ.जमन अनगुलवार, डॉ. रत्ना कीर्तने, प्रा. श्वेता मदने, डॉ.महेश कराळे, डॉ. रामशेट्टी शेटकार, प्रा. बनसोडे आदी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

पुरोगामी विचाराचे
एकमत



# आत्मनिर्भर भारतासाठी महिला सक्षमीकरणाची गरज




**लातूर : प्रतिनिधी**

महिला सबलीकरण करणे ही आधुनिक काळाची गरज असून महिलांनी कोणत्याही क्षेत्रात सक्षमपणे, आत्मविश्वासाने काम केले पाहिजे. हे काम करत असताना अनेक अडथळे येतात. त्या अडथळयांवर मात करीत वाईन उद्योगाच्याही क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटवला पाहिजे. जर मनोबल भरभक्कम असेल तर कोणत्याही क्षेत्रात यश हे निश्चितपणे मिळते. याचबरोबर प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे जसा स्त्रीचा हात असतो, तसाच स्त्रीच्या यशामागे पुरुषांचा हात असतो. म्हणून या पुरुषप्रधान संस्कृतीत, संसाररुपी रहाटगाडयात दोघांनीही एकमेकांना साथ देत कोविड-१९ च्या काळात आत्मनिर्भर भारतासाठी आपली पावले सक्षमपणे टाकली पाहिजेत, असे प्रतिपादन पुणे येथील ममता भारद्वाज यांनी केले.

दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त 'वाईन उद्योग आणि त्यावरील विविध पैलूंचा अभ्यास' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यान संपन्न झाले. यावेळी त्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या. याप्रसंगी सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे, जैवतंत्रज्ञान समन्वयक डॉ. कोमल गोमारे, डॉ. महेश कराळे, प्रा. करूणा कोमटवार, प्रा. संकेत बनसोडे, प्रा. श्वेता मदने यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राहुल मोरे यांनी केले. प्रमुख पाहुण्याचा परिचय व कार्यक्रमाचे आभार समन्वयक डॉ. कोमल गोमारे यांनी मानले. मायक्रोसॉफ्ट टिम्सच्या माध्यमातून संपन्न झालेल्या सदरील कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी प्रोत्साहन दिले.

# आत्मनिर्भर भारतासाठी महिला सक्षमीकरणाची गरज- ममता भारद्वाज

लातूर : महिला सबलीकरण करणे ही आधुनिक काळाची गरज असून महिलांनी कोणत्याही क्षेत्रात सक्षमपणे, आत्मविश्वासाने काम केले पाहिजे. हे काम करत असताना अनेक अडथळे येतात. त्या अडथळ्यांवर मात करीत वाईन उद्योगाच्याही क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटवला पाहिजे. जर मनोबल भरभक्कम असेल तर कोणत्याही क्षेत्रात यश हे निश्चितपणे मिळते. याचबरोबर प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे जसा स्त्रीचा हात असतो, तसाच स्त्रीच्या यशामागे पुरुषांचा हात असतो. म्हणून या पुरुषप्रधान संस्कृतीत, संसाररुपी रहाटगाड्यात दोघांनीही एकमेकांना साथ देत कोविड-१९ च्या काळात आत्मनिर्भर भारतासाठी आपली पावले सक्षमपणे टाकली पाहिजेत, असे प्रतिपादन पुणे येथील ममता भारद्वाज यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त म वाईन उद्योग आणि त्यावरील विविध पैलूंचा अभ्यास म या विषयावरील ऑनलाईन व्याख्यान संपन्न झाले. यावेळी त्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या. याप्रसंगी सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ.राहुल मोरे, जैवतंत्रज्ञान समन्वयक डॉ.कोमल गोमारे, डॉ. महेश कराळे, प्रा. करूणा कोमटवार, प्रा.संकेत बनसोडे, प्रा. श्वेता मदने यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राहुल मोरे यांनी केले तर प्रमुख पाहुण्याचा परिचय व कार्यक्रमाचे आभार समन्वयक डॉ.कोमल गोमारे यांनी मानले.मायक्रोसॉफ्ट टिम्सच्या माध्यमातून संपन्न झालेल्या सदरील कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड व उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी










प्रोत्साहन व शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाप्रसंगी प्राध्यापक, सर्व विभाग प्रमुख,शिक्षकेत्तर कर्मचारी व उस्फूर्त प्रतिसाद देत विद्यार्थी उपस्थित होते.

# दयानंद विज्ञानमध्ये ऑनलाईन वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी** : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात 'राष्ट्रीय विज्ञान दिना' २०२१च्या निमित्ताने ऑनलाईन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाल्या. या वादविवाद स्पर्धेसाठी 'ऑनलाइन शिक्षण पद्धती : चांगली की वाईट ' आणि वक्तृत्व स्पर्धेसाठी ' माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान शिक्षण : काळाची गरज ' हे विषय होते. या ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेत स्वरांजली चौधरी ही सर्वप्रथम आली तर कृष्णकुमार सोनवणे हा सर्वद्वितीय आला आणि स्वरूप गावकरे याने सर्वतृतीय क्रमांक पटकाविला.याशिवाय वादविवाद स्पर्धेत प्रतिक्षा कुलकर्णी ही सर्वप्रथम आली तर स्मितांजली कांबळे ही सर्वद्वितीय आली आणि स्वरूप गावकरे यांनी सर्वतृतीय क्रमांक मिळविला.या दोन्ही स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे



प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांच्या हस्ते अनुक्रमे २०००, १५०० आणि १००० रुपये रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

यांप्रसंगी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड म्हणाले की, कोरोनाच्या काळात ऑनलाइन शिक्षण देणे, घेणे ही आधुनिक काळाची गरज आहे. कारण शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे, ती कधीही थांबवता येत नाही. आजचे युग हे माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचे आहे. त्यामुळे या शिक्षण व माहिती ज्ञानविज्ञान, तंत्रज्ञानातूनच विद्यार्थी घडतात असे ते म्हणाले.

या ऑनलाईन सदरील स्पर्धांचे समन्वयक म्हणून जैवतंत्रज्ञान विभागातील डॉ.कोमल गोमारे व सहसमन्वयक म्हणून संगणकशास्त्र विभागातील प्रा. निकिता शिंदे यांनी काम पाहिले. तसेच दयानंद कला महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. प्रशांत मान्नीकर, दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. आकांशा भांजी आणि दयानंद विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. चंद्रशेखर स्वामी यांनी या दोन्ही स्पर्धांचे परीक्षक म्हणून आपली भूमिका पार पाडली. या ऑनलाइन स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. करुणा कोमटवार यांनी केले तर प्रा. श्र्वेता मदने यांनी पारितोषिक समारंभाचे आभार मानले. सदरील स्पर्धेत क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही अभिनंदन व कौतुक केले.

कुलस्वामिनी संदेश दैनिक लातूर रविवार दि

# दयानंद विज्ञानमध्ये ऑनलाईन वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा संपन्न



लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात मराष्ट्रीय विज्ञान दिनाफ २०२१च्या निमित्ताने ऑनलाईन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाल्या. या वादविवाद स्पर्धे साठी मऑनलाइन शिक्षण पद्धती : चांगली की वाईट म आणि वक्तृत्व स्पर्धेसाठी म माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान शिक्षण : काळाची गरज म हे विषय होते. या ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेत स्वरांजली चौधरी ही सर्वप्रथम आली तर कृष्णकुमार सोन-वणे हा सर्वद्वितीय आला आणि स्वरूप गावकरे याने सर्वतृतीय क्रमांक पटकाविला.याशिवाय वादविवाद स्पर्धेत प्रतिक्षा कुलकर्णी ही सर्वप्रथम आली तर स्मितांजली कांबळे ही सर्वद्वितीय आली आणि स्वरूप गावकरे यांनी सर्वतृतीय क्रमांक मिळविला.या दोन्ही स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांच्या हस्ते अनुक्रमे २०००, १५०० आणि १००० रुपये रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड म्हणाले की, कोरोनाच्या काळात ऑनलाइन शिक्षण देणे, घेणे ही आधुनिक काळाची गरज आहे. कारण शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे, ती कधीही थांबवता येत नाही. आजचे युग हे माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचे आहे. त्यामुळे या शिक्षण व माहिती ज्ञानविज्ञान, तंत्रज्ञानातूनच विद्यार्थी घडतात असे ते म्हणाले.

या ऑनलाईन सदरील स्पर्धांचे समन्वयक म्हणून जैवतंत्रज्ञान विभागातील डॉ. कोमल गोमारे व सहसमन्वयक म्हणून संगणकशास्त्र विभागातील प्रा. निकिता शिंदे यांनी काम पाहिले. तसेच दयानंद कला महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. प्रशांत मात्रीकर, दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. आकांक्षा भांजी आणि दयानंद विज्ञान महाविद्यालयातील वनस्प-तीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. चंद्रशेखर स्वामी यांनी या दोन्ही स्पर्धांचे परीक्षक म्हणून आ-पली भूमिका पार पाडली. या ऑनलाइन स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. करुणा कोमटवार यांनी केले तर प्रा. श्वेता मदने यांनी पारितोषिक समारंभाचे आभार मानले. सदरील स्पर्धेत क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही अभिनंदन व कौतुक केले.